प्रकरण तिसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणे

प्रकरण तिसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील व्यक्तीचित्रणे

प्रस्तावना

१.कथेतून येणारी *स्त्री* व्यक्तिरेखा

१.१ तरुण मुलींचे विश्व

१.२ कथेतून येणारी प्रेयसी

१.३ *आई* ची व्यक्तिरेखा

२.पुरुष व्यक्तिरेखा

२.१ वडील

२.२ प्रियकर

२.३ भाऊ

२.४ कलाक्षेत्रातील व्यक्तिरेखा

२.५ पौगंडावस्थेतील मतिमंद मुलांच्या व्यक्तिरेखा

सारांश

प्रकरण : तिसरे

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणे

प्रस्तुत प्रकरणात मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास आपण करणार आहोत. त्यांच्या कथेमधून विविध स्तरीय व्यक्तिरेखा प्रकट होतात. तसेच व्यवसायानुसार, वयानुसार, लिंगानुसार बदलत जाणाऱ्या स्वभावाच्या व्यक्ती त्या आपल्या कथेतून साकारतात. त्यांच्या कथा नायक व नायिकाप्रधान आहेत. त्यांच्या साहित्यकृतीमधून सामाजिक, सांस्कृतिक जीवनक्षेत्रातील विविध व्यक्तिस्वभावाचे नमुने चित्रित झाले आहेत.

व्यक्तिरेखा हा कथा-कादंबरीतील महत्त्वाचा घटक असतो. बऱ्याचवेळा कथेतील व्यक्तिरेखा घटनांची निर्मिती करत असते, तर बऱ्याचदा कथेतील घटनेतून व्यक्तिरेखेची निर्मिती होत असेते. व्यक्तिरेखा म्हणजेच कथेतील पात्र होय. व्यक्तिरेखा किंवा पात्र ही संज्ञा स्पष्ट करताना सुधा जोशी म्हणतात, *कथाकादंबरीत शब्दांतून मूर्त केलेली एखाद्या व्यक्तीची प्रतिमा म्हणजे पात्र. व्यक्तीचे बहिरंग आणि तिचे अंतरंग म्हणजे तिचे बोलणेवागणे, स्वभावविशेष, तिच्या वृत्तिप्रवृत्ती, तिचे भावविश्व, तिची जीवनदृष्टी, जीवनसरणी इत्यादींच्या चित्रणातून पात्राची विशिष्ट प्रतिमा साकार होते.* (सुधा जोशी : २०००: ५) कथा वाचत असताना कथेतील व्यक्तिरेखा नायक, नायिका किंवा प्रतिनायक या स्वरूपात समोर येत असते. तर बऱ्याच वेळा नायक-नायिकेच्या शेजारची व्यक्ती त्याच्या स्वभाव-वृत्तींनी ठळक होत असते. या व्यक्ती लेखकाच्या कल्पनेतील किंवा आसपासच्या वास्तव जीवनातील असतात. त्या लेखकाच्या विचारसरणीतून संस्कारीत होऊन येत असतात. कथेमधील प्रमुख व दुय्यम व्यक्ती लेखकाच्या निवेदनशैलीतून वाचकाच्या समोर येत असते. त्यामुळे विशिष्ट व्यक्तिरेखा साकारण्याचे, तिला बरे-वाईट स्वरूप देण्याचे काम लेखक करत असतो.

त्यांच्या जीवनाला, भावनांना तो साहित्यातून गुंफत असतो. या व्यक्तिरेखांचे जीवन, त्यांचे स्पष्ट होणारे स्वभाव, वृत्ती यामुळे स्पष्ट होतेच पण त्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखक आपल्या विचारसरणीलाही प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या मांडत असतो.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून वेगवेगळ्या स्वभावाच्या, वैशिष्ट्यपूर्ण जीवन जगणाऱ्या विविध व्यक्ती येतात. शहरी वातावरणात वावरणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिरेखा त्या आपल्या कथेतून व्यक्त करतात. मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथेतून व्यक्तींचे जीवन, त्यांच्या मानसिक-शारीरिक पातळीवरील व्यवहार, त्यांच्या जगण्याची अनोखी रीतीचे, चित्र रेखाटतात. कथालेखिका म्हणून त्या ज्या क्षमतेने स्त्री व्यक्तिरेखा उभ्या करतात. त्यांच्या प्रश्नांना, अडचणींना, त्यांच्या मानसिक आंदोलनांना मांडतात. त्याच सामर्थ्याने त्या पुरुष व्यक्तिरेखादेखील साकार करतात. पुरुषांच्या शारीरिक आणि मानसिक दोन्ही पातळ्यावरील व्यवहार त्या चित्रित करतात. या दोन्ही पातळ्यावरील संबंध आणि त्यामध्ये निर्माण झालेले पेच, गुंते आणि यामध्ये घुसमटलेला, तुटलेला, एकटा पडलेला पुरुष त्या विलक्षण पद्धतीने रेखाटतात. व्यक्तिरेखांच्या संदर्भात मोनिका गजेंद्रगडकर म्हणतात, *कथा म्हणजे 'गोष्ट' नाही, तसा अनुभवाचा वृत्तांतही नाही, तर ती त्या त्या लेखकाची दृष्टी असते. या 'दृष्टी' तून तो अनुभवाचा अन्वयार्थ शोधत-मांडत असतो. व्यक्तिरेखांतून, त्यांच्या आयुष्यातून, भावनिक-वैचारिक स्पंदनातून एकूण मानवी जीवनाचं, मानवी अस्तित्त्वाचं त्याचं ते चिंतन असतं. त्याची पात्रं त्याच्या काल्पनिक जगातली असतात तशी ती वास्तवातली असूनही खरीही नसतात आणि खोटीही.* (मोनिका गजेंद्रगडकरः साक्षात२००८:३३)

त्यांच्या कथा नायक व नायिकाप्रधान आहेत. औद्योगिकरणामुळे विस्कटलेल्या कुटुंबाला एकत्र सांधण्याचा दुबळा प्रयत्न करणारी आई, शारीरिक गरजेतून निर्माण झालेले संबंध व त्यामुळे निर्माण झालेला गुंता सोडविणारा चित्रकार, आईच्या अनैतिक वागण्याचे कारण शोधणारी मुलगी, मुलाच्या मृत्यूनंतर उद्ध्वस्त झालेले आई-वडील, वडिलांमुळे आपल्या अभिजात संगीताकडे परत जाणारा मुलगा अशा अनेक व्यक्तिरेखा त्या कथेतून

रेखाटतात. याबरोबरच कला क्षेत्राशी निगडित असणाऱ्या व्यक्ती आणि त्याचे तऱ्हेवाईक जगणे त्या वेगळ्या ढंगातून मांडतात. तर बौद्धिक पंगुत्व आलेली व पौगंडावस्थेच्या उंबरठ्यावरील मुलांच्या व्यक्तिरेखा त्या अतिशय हळूवारपणे साकारतात. या व्यक्तिरेखांचा अभ्यास इथे केला आहे.

१. कथेतून येणारी 'स्त्री'ची व्यक्तिरेखा :

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून बहुतांशी स्त्री जीवनाचे चित्रण येते. मुलगी, बहीण, प्रियसी, आई अशी वेगवेगळी स्त्रीरूपे त्यांनी रेखाटली आहेत. अशा वेगवेगळ्या कसोट्यातून जाणारी प्रेमळ, आत्मविश्वासू, प्रसंगी कठोर बनणारी, मातृत्वासाठी व्याकूळ होणारी, जीवाच्या आकांताने घराला बांधून ठेवू पाहणारी स्त्री अशा व्यक्तिरेखा कथेतून साकारलेल्या आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री विविध पातळीवर वावरताना दिसते.

स्त्रीजवळ निसर्गतः असणाऱ्या सोशिकपणाचे चित्रण लेखिका काही स्त्री पात्रातून करतात. यामध्ये *देणं* कथेतून येणारी गजाननची पत्नी नलू. आपला पती एका दुसऱ्याच स्त्रीबरोबर राहतो हे माहीत असूनही ती याबाबत त्याला काहीच बोलत नाही. उलट जास्त समजुदारपणे वागते. नलूच्या ठिकाणचा सोशिकपणा यातून दिसतो. हेच दृश्य काहीसे *जन्म* कथेतही दिसते. जे नलूच्या बाबतीत घडते तेच बाईंच्या बाबतीत. पण या सर्व गोष्टी माहीत असूनही बाई त्याबद्दलची वाच्यता संपूर्ण कथेभर कुठेही करताना दिसत नाहीत. *स्त्रीवादी* कथालेखन असे त्यांच्या कथाबाबत म्हणता येत नसले तरी त्यांच्या कथांतून वावरणाऱ्या स्त्रियांना आलेले आत्मभान, स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार, कोणत्याही बाबतीतले अन्याय सहन न करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथाचित्रणातून येतात. पण आपल्या अधिकाराबरोबर ती तेवढ्याच सामर्थ्याने जबाबदाऱ्या पेलते. काही वेळा अविचाराने घेतलेले निर्णय स्त्रीच्या बऱ्याचवेळा अंगलटीही येऊ शकतात याचेही चित्रण लेखिका करतात.

१.२ तरुण मुलींचे विश्वः

लेखिकेने कथेतून स्त्रीच्या विविध रूपांचा परिचय स्त्री व्यक्तिरेखांच्या माध्यमातून करुन दिला आहे. त्यांच्या कथेतून वावरणारी मुलगी ही व्यक्तिरेखा नीना, अंजू, नेत्रा, मीता, राधा, रेणू यांच्यामधून साकारते. नात्याने मुलगी असली तरी प्रत्येकीचे कुटुंबातील स्थान, तिचे आई-वडिलांशी असलेले नाते या प्रत्येक बाबतील भिन्नता दिसते. *अनोळखी* मधील नीना परदेशी संस्कृतीतील मूल्यांना फारशा ताकदीने आत्मसात करु शकत नाही. स्त्री-स्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेला स्वैराचार, त्यातून आपल्या मुलीच्या बाबतीत उद्‌भवलेल्या समस्या यामुळे चिंतीत होणारी व्यक्तिरेखा यातून उभी राहते. तसेच परदेशी कुटुंबात स्थिर झालेली भारतीय वंशीय मुलगी आणि तिच्या स्वतःच्या मुलगीची होत असणारी परवड यातून चित्रित होते.

नाळ कथेतील नेत्रा ही व्यक्तिरेखा आईपासून दूर राहणारी, तरीही तिच्या प्रेमासाठी आसूसलेली आहे. कुटुंबातील अंतर्गत तणावामुळे निर्माण झालेला गुंता समजावून घेऊन सोडवू पाहणारी आहे. आईचे आईपण समजून घेता-घेता स्त्री म्हणून तिच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन त्याचा सन्मान करणारी मुलगी या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून उभी राहते. *बाबाची आई* मधील राधा आई-वडिलांच्या वेगळे होण्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीला सामोरे जाणारी, आई आणि वडील दोघांच्याही प्रेमासाठी आसूसलेली आणि या दोघांना एकत्र बांधू ठेवू पाहणारी अशी आहे. तर संक्रमण या कथेतील रेणू ही व्यक्तिरेखा आपल्यावरील अन्यायाला तोंड देऊन स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. रेणूला तिच्याच कुटुंबात एक मुलगी म्हणून आईकडून हीन लेखले जाते. कुटुंबातील सर्व जबाबदाऱ्या पेलू शकणारी रेणू आईकडून मात्र कमी लेखली जाते. पण हे सर्व ती फार काळ सहन न करता त्या परिस्थितीवर मात करते. अशा वेगवेगळ्या पातळ्यावरील *मुली* ची व्यक्तिरेखा साकारली आहे.

१.२ कथेतून येणारी प्रेयसी :

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून विविध व्यक्तिरेखा साकार होतात. त्यातून प्रेयसीची विविध रूपे व्यक्त झाली आहेत. अत्याधुनिक युगात प्रेम आणि त्याच्याभोवती रचलेले नातेसंबंध किती तकलादू आहेत, फसवे आहेत याचेच प्रतिबिंब त्यांच्या कथेतील निर्मला, वनिता, मालविका, अंजू या व्यक्तिरेखांतून दिसते. आपल्या प्रेमातून विश्व निर्माण करणारी, तसेच प्रेमासाठी आसुसलेली पुरुषाच्या प्रेमाच्या संकुचित विचारामुळे अन्यायित झालेली अशी वेगवेगळी पात्रे समोर येतात. निर्मला प्रेमाच्या बदललेल्या संकल्पना समजू शकते. पण प्रेमाच्या नात्यामध्ये झालेल्या व्यावहारिकतेच्या जाणिवेतूने ती स्तंभित होते. गजानन पाठक नावाच्या लेखकाच्या ती प्रेमात पडते आणि लग्नाशिवायच त्याच्याबरोबर सामाजिक नियमनाचा विचार न करता राहू लागते. पण आपल्या कुटुंबाची जबाबदारी आपल्यावर आहे या जाणीवेतून तो तिची व तिच्या जन्माला येणाऱ्या मुलाची जबाबदारी मात्र तो टाळतो. पण अशा परिस्थितीतही ती आपला आत्मविश्वास न गमावता आपल्या मुलाला जन्म देण्याची इच्छा मनी बाळगते. यात तिचा स्वतंत्रपणा, कणखरपणा अधोरेखित होतो.

अशीच एक व्यक्तिरेखा म्हणजे *जन्म* कथेतील मालविका. ती लग्नाशिवाय नाथांबरोबर राहते. आणि आपल्या मुलाला जन्मही देऊ इच्छिते. तसेच *अनोळखी* कथेतील अंजू देखील लग्नाशिवायच्या संबंधातून निर्माण झालेल्या मूलाला जन्म देऊ इच्छिते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंजू आपल्या मुलाचा जन्मदाता कोण आहे हे माहीत नसतानाही हे धाडसी पाऊल उचलते आहे. प्रेयसी म्हणून गणल्या गेलेल्या या व्यक्तिरेखा वेगवेगळ्या ठिकाणच्या, वेगवेगळ्या समाजात, परिस्थितीतल्या असल्या तरी या तिन्ही व्यक्तिरेखा एकाच टप्प्यावर आल्याचे दिसते. त्यांनी घेतलेले निर्णय स्वैराचारातून येतात की त्यांच्या स्वतःच्या आर्थिक स्वावलंबनातून आणि आत्मविश्वासातून? प्रत्येकीच्या ठिकाणी ही गोष्ट वेगवेगळी लागू पडते. पण एक गोष्ट स्पष्ट आहे की ह्या तिन्ही व्यक्तिरेखा कोणाच्याही दबावाखाली न

येता स्वतःच्या निर्णणावर ठाम राहतात. *यासंदर्भात केशव तुपे म्हणतात, 'मातृत्व हे स्त्रीचे एक प्राकृतिक मूल्य मानावे लागते. कधी तिच्यावर सक्तीने मातृत्व लादले जाते. मोनिकांच्या काही कथा हा मातृत्वभाव जतन करणाऱ्या, विकसित करणाऱ्या अशा आहेत. त्यातील काही स्त्री व्यक्तिरेखांना आपली मातृत्वाची प्राकृतिक ओढ स्वस्थ बसू देत नाही.* (केशव तुपे : मार्च२००९:५४)

कथेतून साकारलेले हे प्रेयसीचे रूप विलक्षण आहे. पूर्वीच्या काळी अशा संबंधांना अनैतिक समजून अशा जन्माला येणाऱ्या मुलाला, स्त्रीला वाईट वळणाची ठरविले जायचे. पण स्त्रीचा स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला आणि त्या जोरावरच त्या अशा निर्णयापर्यंत पोहचू लागल्या. प्रदीर्घ कालखंडात बदललेल्या या विचारसरणीला लेखिका या व्यक्तिरेखांच्या जीवनशैलीतून अधोरेखित करतात.

या व्यक्तिरेखांतून बंडखोरी, सामाजिक नियमनांना झुगारुन देणाऱ्या वृत्तीच्या तरुणी दिसतात. तसेच आपल्यातील *स्वतंत्र*पण जपू पाहणाऱ्या या तरुणी आपल्या तत्त्वांशी कशा एकनिष्ठ राहतात याचे प्रतिबिंब या कथांतून दिसते.

१.३ *आई*ची व्यक्तिरेखा :

लेखिकेच्या दोन्ही कथासंग्रहातून येणारी आईची व्यक्तिरेखा काहीवेळा कुटुंबातील प्रमुख म्हणून येते. तर काही वेळा तिचे कुटुंबातील मुख्य स्थान हिसकावून घेतले जाते. पण अशा दोन्हीही परिस्थितीत कुटुंबाला बांधून ठेवण्याचे काम मात्र ती नेहमी करताना दिसते.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाने व परदेशी शिक्षण पद्धतीतील विकसित रूपाकडे आजची तरुण पिढी आकर्षिली जाते. कुटुंबाचे विस्कटलेपणाचे रूप *अनोळखी* कथेत येते. पण कुटुंबाचे बलस्थान असणारी ताराबाई आपल्या मुलांना आपल्या कुटुंबाशी बांधून ठेवण्याचा सतत प्रयत्न करत राहते. कुटुंबात होणाऱ्या बदलाच्या जाणिवेने अस्वस्थ होणाऱ्या ताराबईंची व्यक्तिरेखा येते. ताराबाईंची मुलगी नीना हीदेखील एका मुलीची-अंजूची आई आहे. *फ्रि*

रिलेशनशिप म्हणून मित्राबरोबर संबंध ठेवणाऱ्या, गरोदर असणाऱ्या अंजूच्या या अवस्थेला काही अंशी नीनाच जबाबदार आहे. लेखिकेने ताराबाई आणि नीना या दोन व्यक्तिरेखा अशा पद्धतीने उभ्या केल्या आहेत की, ज्यामुळे दोन पिढ्यांत निर्माण झालेल्या नैतिक, सांस्कृतिक अंतराचे चित्रण येते. स्वातंत्र्याच्या नावाखाली चाललेला लैंगिक स्वैराचार, नीतिमूल्यांमध्ये आलेला पोकळपणाचे चित्रण या व्यक्तिचित्रणातून होते. आई म्हणून व्यवस्थित जबाबदाऱ्या पार पाडणारी आणि तरीही परिस्थितीमुळे हतबल झालेली ताराबाई आणि पाश्चात्य संस्कृतीतील विचारांखाली दबलेली नीना या दोन्ही व्यक्तिरेखा लेखिकेने आपल्या कथेतून रंगविल्या आहेत.

नाळ कथेतील सुमित्रा आणि *अर्थ* कथेतील वीणा या दोन्ही व्यक्तिरेखा आईचे मूर्तिमंत रूप म्हणावे लागेल. पण परिस्थितीने त्यांच्यासमोर टाकलेल्या अडचणी आणि त्यामध्ये त्यांच्या मातृत्त्वाची झालेली परवड या कथांमधून येते. सुमित्राला पत्नी म्हणून अनेक शारीरिक-मानसिक अत्याचार पतीकडून सहन करावे लागतात. यामुळेच ती दुसऱ्या पुरुषांकडे निघुन जाते. यात तिच्या आणि मुलीच्या नात्यामध्ये निर्माण झालेली पोकळी व ही पोकळी कमी करण्यासाठी तिच्याकडून होत असलेली खटपट, मुलीच्या प्रेमासाठी आसुसलेले तिचे मन याचे ऋणानुबंध या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखिका मांडतात. तर अशीच अपघातात गमावलेल्या मुलीच्या दुःखाने शोकाकुल असणारी, पण मोठ्या जिद्दीने स्वतःला व नवऱ्याला सावरणारी *अर्थ* मधील वीणा. तिच्या मातृत्वाला मतिमंद गणेशच्या रूपाने परत पालवी फुटते. आपल्या मुलीसारखेच उत्कट प्रेम ती गणेशवरही करते. गणेशचा तिला मोठा आधार असतो. पण हा आधार फार काळ टिकत नाही. या दोन्ही कथांमधील मुलाच्या प्रेमासाठी तडफडणारी *आई* लेखिका रेखाटते.

स्त्री आई म्हणून जेवढी हळवी असते तेवढीच ती प्रसंगी कठोर बनते हे *श्रद्धा* कथेतील यशोदेच्या माध्यमातून चित्रित होते. हिंदू यशोदा मुस्लिम सय्यदशी लग्न करते. सर्व धर्माला समान मानणारे हे पुरोगामी दाम्पत्य. पण त्यांचा मुलगा मात्र धर्माच्या कट्टर

विचारांच्या आहारी जातो. यशोदाला ह्या गोष्टी जाणवल्यामुळे ती त्याला अटकाव करते. आपल्या मुलामधील हे बदल त्याला दुष्टचक्रात ओढणारे असल्याने ती भयभीत होते पण सर्व गोष्टीला तिलाच जबाबदार धरुन तिचा मुलगा तिच्यावरच अन्याय करु लागतो. आपल्या सहनशीलतेनुसार ती सहन करते पण मर्यादेच्या बाहेर गेल्यानंतर मात्र ती घर सोडते. मर्यादेबाहेर जाणाऱ्या गोष्टींचा अटकाव करण्यासाठी ती प्रसंगी कशी कठोर बनते याचे प्रतिबिंब यशोदा या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून लेखिका मांडतात.

स्वतःच्या नवऱ्याच्या कमी बुद्धीमुळे त्याचा आईप्रमाणे सांभाळ करणारी पण फार काळ या गोष्टी सहन न करु शकणारी आई *बाबाची आई* या कथेतून येते. तर मुलगा आणि मुलगी असा पारंपरिक भेद आपल्या मुलांमध्ये करणारी आईची प्रतिमा *संक्रमण* कथेतून येते. शिक्षण घेऊन स्वतःच्या सामर्थ्यावर पैसा मिळवून घर चालविणारी रेणू घरात दुय्यम लेखली जाते. आणि फारसे काही न करू शकणारे तिचे भाऊ केवळ पुरुष म्हणून श्रेष्ठ मानणारी रेणूची आई. पारंपरिक, बुरसटलेल्या विचारांमध्ये गर्क असलेली व स्वतःच्या कुटुंबाच्या पडझडीला जबाबदार ठरलेली अशी ही व्यक्तिरेखा आहे. तर आपल्या मुलाला मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढून त्याला नव्याने जन्म देणाऱ्या एका सामर्थ्यशाली आईची व्यक्तिरेखा *जन्म* या कथेतून येते. अभिजात संगीतावर प्रेम करणाऱ्या बाई म्हणजेच सत्यजितची आई. वडिलांचे मालविकाशी असणारे संबंध आणि त्याच्याही मनी त्याच व्यक्तिविषयी वाटणारी हुरहूर यातून नात्यांमध्ये निर्माण झालेला गुंता लक्षात आल्यामुळे सत्यजित नैराश्याने आत्महत्येचा प्रयत्न करतो. पण तो तिचे सर्वस्व असतो. त्याला गमावण्याचा विचारही ती सहन करु शकत नाही आणि त्यामुळेच ती नव्या सामर्थ्यानिशी सत्यजीतला पुन्हा एकदा जन्म देते.

मोनिका गजेंद्रगडकर यांनी या दोन्ही कथासंग्रहातील कथामधून साकारलेल्या या आईच्या भिन्न भिन्न व्यक्तिरेखा आहेत. आपल्या प्रेमातून मुलांना-कुटुंबाला जोडणारी, आत्मभान आल्याने घेतलेल्या निर्णयामुळे होणाऱ्या मातृत्त्वाच्या वाताहतीला कारणीभूत

ठरलेली, तर आपल्याच मुलांमध्ये मुलगा-मुलगी म्हणून भेदभाव करणारी, तितकेच उत्कट प्रेम करणारी आणि प्रसंगी कठोर वागणारी तर जगाच्या स्पर्धेत कमकुवत ठरलेल्या मुलाला परत एकदा जन्म देणारी अशी आईची अनेक रूपे कथेतून साकारलेली आहेत.

या कथांतून येणाऱ्या व्यक्तिरेखा या स्वतःची ओळख व जिवतंपणा घेऊन येतात. यातील स्त्री व्यक्तिरेखांबाबत केशव तुपे म्हणतात *या प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा ह्या उच्चशिक्षित व उच्च मध्यमवर्गीय विशिष्ट सांस्कृतिक चौकटीत जगणाऱ्या अशा आहेत. त्यामुळे लेखिकेने त्यांना एक बौद्धिक उंची प्रदान केली आहे. आणि ती योग्यही ठरते. परिणामी या नायिका त्या जगत असलेल्या सामाजिक, सांस्कृतिक चौकटीला आतून-बाहेरुन नीटपणाने पाहू शकतात. (केशव तुपे : मार्च-एप्रिल२००९:५५)*

२. पुरुष व्यक्तिरेखा :

मोनिका गजेंद्रगडकर यांनी स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण परिणामकारकरित्या केले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कथेतून पुरुष व्यक्तिरेखांचे चित्रणही प्रभावीपणे आले आहे. दररोजच्या जगण्यात पुरुष म्हणून त्यांच्या वाट्याला आलेल्या सुख-दुःखाच्या अनुभवांचे, त्यांच्यातील परस्परविरोधी स्वभावांचे वागण्या-बोलण्याचे, त्यांच्या न्यूनगंडाचे, आत्माविष्काराचे चित्रण पुरुष व्यक्तिरेखांद्वारे होताना दिसते. सामान्य व्यक्ती, उच्च पदी काम करणारी व्यक्ती, धर्माच्या आहारी गेलेल्या, शरीर सुखासाठी आसुरलेल्या, तसेच शरीरापेक्षा मनावर प्राजंळपणे प्रेम करणाऱ्या, कला क्षेत्राशी संबंधधित आणि बौद्धिक पंगुत्व आलेल्या, अशी पुरुषांची निरनिराळी रूपे या कथांतून येतात. पुरुष-विरुद्ध स्त्री अशा प्रकारचे चित्रण न करता दोघांनाही समान न्यायाने त्या चित्रित करतात. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या त्या आपल्या व्यक्तिरेखांवरती संस्कारही करत असतात.

कुटुंबप्रमुख, वडील, प्रियकर, भाऊ, पती, कलाप्रेमी दांम्पत्याचा मुलगा अशा विविध भूमिकांतील पुरुषपात्र त्यांच्या कथेत येते. भाऊ-बहीण किंवा वडील-मुलाचे परस्परविरोधी

संबंध, या संबंधातून मानसिकदृष्ट्या एकाकी पडलेला मुलगा, भाऊ वा वडील यांचे भावविश्वही या व्यक्तिचित्रणाबरोबर येते. कथेतील व्यक्तीचा परिचय कधी पूर्णपणे तर कधी अस्पष्टसा येत असला तरी त्यामुळे कथेला एक वेगळा रंग येताना दिसतो.

२.१ वडील :

अनोळखी मधील नीना व मंदारचे वडील आपल्या मुलांना शिक्षणासाठी परदेशी पाठवितात. पण त्यांच्या आजारपणात देखील ही मुले त्यांना भेटायला येऊ शकत नाहीत. ते आपल्या मनातील इच्छा दाबून ठेवतात. *नाळ* या कथेतील वडील विलक्षण प्रवृत्तीचे जाणवतात. पत्नीकडून फक्त शरीरोपभोगाच्या अपेक्षा बाळगणारे, स्त्रीच्या शरीरापलिकडे तिच्या मनाची विचारपूसही न करणारा पुरुष आणि त्यांच्या वासना, आपल्या लहान मुलीला आईशी भेटू न देणारा कठोर हृदयाचा पुरुष आणि पिता म्हणून लेखिकेने या व्यक्तिरेखेतून मांडला आहे. तर याउलट *श्रद्धा* मधील पिता-सय्यद. तो आपल्या हिंदू पत्नीवर कधीही धर्माची बंधने लादत नाही. आपल्या धर्मातील आचरणपद्धती स्वीकारण्याची तिच्यावर कधीही जबरदस्ती करत नाही. उलट तिच्या धर्माबद्दल आदर बाळगणारा आहे. याबद्दलचे कडवे संस्कारही तो आपल्या दोन्हीं मुलांवरती करत नाही. पण आपला मुलगा मुस्लिम धर्मातील ढोंगी लोकांच्या आहारी गेल्याची जाणीव होताच आतून उद्ध्वस्त होत जाणारा एक संवेदनशील पिता या कथेतून येतो. *बाबाची आई* मधील राधाचे बाबा हे बुद्धीच्या कमतरतेमुळे कुटुंबाच्या विघटनाला कारणीभूत ठरतात. या कथेतील ही व्यक्तिरेखा खूपच निराळी आहे. आपल्या मुलीवर प्रेम करण्याची पद्धत, समोरील माणसाच्या भावना समजून न घेता त्यांच्याबद्दल होत असणारी कृती या सगळ्यामध्ये वेगळेपण जाणवते. पण हे वेगळेपण म्हणजे त्यांचा स्वभाव नव्हे तर त्यांच्याकडून बुद्धीच्या कमतरतेमुळे होत असलेली कृती होय. ते स्वतः एका मुलीचे वडील असूनही त्यांचा सांभाळ अजूनही त्यांची आई करत असते. अशा जगावेगळ्या पित्याची व्यक्तिरेखा या कथेतून येते.

नातं या कथेतील उदार वडील वामनरावांच्या व्यक्तिरेखेतून येतो. आपल्या मृत मुलाच्या पत्नीवर आपल्या इच्छा..आकांक्षा न लादता तिचा विवाह दुसरीकडे करण्याचा निर्णय ते घेतात. आपल्यासाठी सुनेचे संपूर्ण आयुष्य उद्ध्वस्त होऊ नये म्हणून तिचा विवाह करुन देण्याऱ्या उदार बापाची प्रतिमा लेखिका उभी करतात. तर याउलट वेगळा असा पिता *जन्म* या कथेतील नाथ या संगीतप्रेमी व्यक्तिरेखेच्या माध्यमातून येतो. आपल्याच मुलाचे यश, त्याचे आपल्याच क्षेत्रात पुढे जाणे हे नाथांना रुचत नाही. त्यांचे आणि मुलाच्या वयाची असणाऱ्या मालविकाचे संबंध यातून नात्यामध्ये एक वेगळाच पेच निर्माण होतो. यातून निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मानसिकदृष्ट्या दुर्बल झालेला सत्यजित आत्महत्येचा प्रयत्न करतो. स्वतःच्या मुलाची प्रसिद्धी पचवू न शकणारा आपल्या स्वार्थापोटी आपल्या मुलाचा बळी जाण्यास कारणीभूत ठरलेला कठोर हृदयी बाप नाथांच्या व्यक्तिरेखेतून येतो. आपल्या कलेचा व्यापार करणारे, पत्नीच्या संगीतविषयक आगळ्या वेगळ्या प्रेमाला क्षुद्र लेखणारे नाथ एक पती म्हणून आणि वडील म्हणून अयशस्वी झालेले दिसतात. तर *अर्थ* मधील विद्याधरही मुलीच्या मृत्यूनतंर दुःखात अडकून पडतो. संसारातील इतर जबाबदाऱ्याही तो पार पाडू शकत नाहीत. तो या जबाबदाऱ्यापासून दूर जातो. पण त्याला ज्यावेळी स्वतःच्या आजारपणाच्या वेळी घराची, पत्नीची गरज वाटू लागते तेव्हा मात्र त्याला स्वतः केलेल्या चुकांची जाणीव होत राहते.

मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतून येणारी महत्त्वाची पुरुष व्यक्तिरेखा म्हणजे पतीची. त्यांच्या कथातून येणारी ही व्यक्तिरेखा सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबातील असून आपल्या आर्थिक सत्तेच्या बळावर पुरुष कुटुंबाचे भौतिक जीवनमान नियंत्रित करताना दिसतो. तर काही वेळा समविचारी पुरुष कुटुंबामध्ये आपल्या पत्नीलाही महत्त्वाचे मानत असतो. त्यांच्या कथेत स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे, तिच्या शारीरिक आणि मानसिक भावनांचा आदर करणारे पुरुष दिसतात. तर पत्नीच्या कोणत्याही अपेक्षांचा मुलहिजा न ठेवता तिच्या भावनांना पायदळी तुडविणारे पतीही त्यांच्या कथांतून भेटतात. *अनोळखी*

मधील बापू मुलांना शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याचा निर्णय घेतात. या निर्णयामध्ये त्यांना त्यांच्या पत्नीची विचारपूसही करावीशी वाटत नाही. *अर्थ* कथेतील विद्याधर मुलीच्या दुःखाने घर, संसार सोडताना पत्नीच्या भावनांचा जराही विचार करत नाही.

२.२ प्रियकर :

प्रियकर ही अशीच महत्त्वाची व्यक्तिरेखा. परस्परभिन्न वृत्तीच्या दोन व्यक्ती व दोघांच्याही मनामध्ये एकाच व्यक्तिविषयीचे आकर्षण आहे. पण एक स्वार्थ साधणारी तर दुसरी निःस्वार्थी. एक स्वतःच्या फुलण्यासाठी प्रेयसीचा वापर करुन घेणारी तर दुसरी तिच्या फुलण्यासाठी स्वतःला झिजवणारी.

त्यांच्या *देणं* या कथेमध्ये अशा दोन व्यक्तिरेखा येतात. एक गजानन पाठक व दुसरी व्यक्ती म्हणजे दिनकर मेहेंदळे. गजानन हा स्वतः एक लेखक आहे. स्वतःच्या संवेदनेबरोबर समोरच्या माणसाच्या भावविश्वाला जाणून घेणारा, स्पर्श करणारा. तर दिनकर मेहेंदळे पुरातत्त्वशास्त्र विभागातील. जुन्या...पुराण्या, छिन्न..विछिन्न मूर्ती जमा करुन त्या मूर्तीतील भाव जाणणारी. दगडाच्या तुटक्या फुटक्या आकृत्यातून त्या मूर्तीच्या भावविश्वाला स्पर्श करणारी ही व्यक्ती. काहीशी विक्षिप्त व तापट स्वभावाची या दोघांच्याही जीवनात निर्मलाचे स्थान आहे, पण वेगवेगळ्या रूपात. निर्मला मेहेंदळेचे घर सोडून लग्नाशिवाय गजानन बरोबर राहते. त्याला मदत करते. पण गजानन मात्र तिला तिच्या होणाऱ्या मुलासहीत नाकारतो. पण यावेळी पुरातत्त्वातील मुर्तीमध्ये रमणारे मेहेंदळे तिला स्वीकारण्याची, तिच्या मुलाला स्वतःचे नाव देण्याची इच्छा दर्शवितात. या कथेमधून एक व्यक्ती आणि एक प्रियकर म्हणून त्यांचे असणारे वेगळेपण गजानन व मेहेंदळे या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून चित्रित केले आहे.

२.३ भाऊ :

बहिणीच्या रक्षणार्थ सदैव उभा राहणारा, असं भावाच रूप वर्षानुवर्षे महत्त्वाच मानले गेले आहे. पण बदलत्या काळाची परिमाणे बदलली की त्याप्रमाणे स्वतः माणूस आणि त्याच्या आजूबाजूचे बंध-अनुबंधही बदलत जातात. अशाच बदलातून परदेशी स्थिर झालेल्या बहिण-भावाच्या नात्यांमध्ये निर्माण झालेले अतंर *अनोळखी* या कथेतील मंदार या व्यक्तिरेखेतून येते. परदेशी संस्कृतीत रमलेली आणि तिथेच स्थिर झालेले मंदार आणि नीना एकाच शहरात राहतात. दोघांचीही कुटुंबे काही अडचणींनी ग्रासलेली आहेत. पण ती एकमेकांच्या खाजगी आयुष्यात लक्ष देत नाहीत. लहानपणी नीनाला मारले असता रडणारा मंदार आता तिच्या आणि कुटुंबातील दुःखांना समजावूनही घेऊ इच्छित नाही. मंदारच्या मते, *परदेशात कोणालाही खाजगी बाबतीत ढवळाढवळ केलेली आवडत नाही* (*भूप* २००६:५१) या बदलत चाललेल्या मूल्यांचे चित्रण या व्यक्तिरेखेच्या माध्यमातून येते. बाह्य कारणामुळे विखुरलेले कुटुंब आणि कुटुंबातील व्यक्ती-व्यक्तींमधील संबंधावर त्याचा होणारा परिणाम *श्रद्धा* या कथेतील अर्शद आणि असलम या व्यक्तिरेखांतून येतो. दोन भिन्न धर्मातील पुरोगामी विचारांचे पती-पत्नी आणि त्यांची मुले. धार्मिकतेच्या आंधळ्या श्रद्धेवर विश्वास ठेवणारा अर्शद. तर आई-वडिलांच्या पुरोगामी विचारांचा वारसा चालविणारा असलम. कुटुंबातील या परस्परभिन्न विचारांनी आणि कृतींनी युक्त अशा भावा-भावांच्या व्यक्तिरेखा लेखिकेने चितारल्या आहेत. आपल्याला अपयश येते ते आईच्या हिंदू असण्याने, तिचा आपल्या धर्माविषयी असणाऱ्या अनास्थेमुळे अशा गैरसमजामुळे अर्शद स्वतःच्या आईला काफर समजतो. आपला भाऊ हिंदू धर्माचे गुण गातो व मुस्लिम धर्मावर बोट ठेवतो हे न पटल्यामुळे स्वतःच्या भावावर दगडफेक करणाऱ्या अर्शदला असलमची होणारी प्रगती अधिकच खच्चीकरण करत जाणारी ठरते. तो आईला मुस्लिम होण्यास भाग पाडतो तर असलमशी लग्न ठरलेल्या हिंदू वनितावर शारीरिक अत्याचार करतो. अर्शद ही व्यक्तिरेखा खुली करताना डॉ. मीना वैशपायन म्हणतात, - *व्यवहारातला धर्म, धर्माचं व्यापक व सत्य*

स्वरूप यांचा उलगडा अर्शदच्या अपरिपक्व बुद्धीला करता येत नाही. मी म्हणेन तेच बरोबर या वृत्तीने तो घरातल्यांशी वैर धरतो. (मीना वैशंपायन : २००९:७) तर स्वतःच्या आईवडिलांप्रमाणे पुरोगामी असणारा असलम स्वतःच्या धर्माबरोबर इतर धर्मातील चांगल्या गोष्टींचा पुरस्कार करणारा व वाईट गाष्टींना दूर लोटणारा, मनस्वी स्वभावाचा आहे. या कथेतील आई-वडील व भाऊ-भाऊ यांच्यामधील नाती, दुरावणारे आणि जवळ येणारे संबंध याचे चित्रण या व्यक्तिचित्रणातून घडते.

बदलत्या परिस्थितीमध्ये कुटुंबातील संबंध जसे ताणले जातात तसे काही कारणास्तव या व्यक्तींना आपल्या मूळ जीवनाकडे परतून हे ताण कमी करावे लागतात. *रुट्स* या कथेतील केदार आणि श्री या दोन व्यक्तिरेखाही अशाच काही कारणास्तव जवळ आलेल्या दिसतात. आई वडिलांना नको असताना जन्मलेला व जन्मापासूनच आई-वडिलांच्या प्रेमाला पोरका झालेला केदार. तर श्री हा आईवडिलांच्या प्रेमात राहिलेला. पण परदेशी गेल्यानतंर हे जुने नाते तोडून टाकणारा. पण उत्तरोत्तर त्याला याच मायेची आस वाटू लागते. परदेशातील जीवघेण्या स्पर्धेमुळे थकलेला श्री मानसिकदृष्ट्या दुर्बल होतो. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार त्याला त्याच्या पुर्वायुष्याकडे जाण्यासाठी केदारच्या प्रेमाचा आधार हवा असतो. पण केदारला सतत श्री चे आत्मकेंद्री जगणे आठवत राहते. संपूर्ण कथा केदारच्या मानसिकतेतून पुढे सरकते. या कथेतून श्री आणि केदार या दोन व्यक्तिरेखेच्या माध्यमातून दोन्ही भावांची मानसिकता, एकमेकांविषयी वाटणारी आपुलकी, प्रेम आणि एकमेकांशी असणाऱ्या नातेसंबंधाचे चित्रण या कथेतून येते.

३. कलाक्षेत्रातील व्यक्तिरेखा :

मोनिका गजेंद्रगडकर यांनी आपल्या कथांमधून शहरी जीवनातील व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत. त्याचबरोबर त्यांच्या काही कथांमधून लौकिकदृष्ट्या असामान्य जीवन जगणाऱ्या व्यक्तिरेखा येतात. कलाक्षेत्रातील व्यक्ती, त्यांचे संवेदनशील विश्व, असामान्य गुण

व वैचित्र्यपूर्ण वर्तनाचे चित्रण या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून त्या करतात. क्षणाला उत्कट प्रेम आणि क्षणाला तिरस्कार करणाऱ्या या कलाप्रेमी व्यक्ती, त्यांचे परस्परविरोधी विचार आणि वर्तन यामुळे त्याचे परिणाम शेजारच्या व नात्यातील व्यक्तींना भोगावे लागतात. बऱ्या वाईटाचा विचार न करता स्वच्छंद व लहरी व्यक्तींच्या जीवनातील क्लिष्टता व गुंतागुंत *भूप* या कथेतील अवधूतपंत *आधार* कथेतील अरुण व *जन्म* कथेतील नाथ व बाई या व्यक्तिरेखांच्या चित्रणातून येते.

मोनिका गजेंद्रगडकर कलाक्षेत्राशी निगडीत असणाऱ्या व्यक्ती, त्यांची कलेप्रती असणारी निष्ठा आणि ही निष्ठा सांभाळण्यासाठी त्यांची चाललेली धडपड चित्रित करतात. या गुणांनी आविष्कृत झालेली अवधूतपंत ही व्यक्तिरेखा *भूप* या कथेमधून येते. *भूप* या रागाशी नाते सांगणारे आबा *कुठलाही प्रहर कुठल्याही स्वरांना बंधनकारक नसतोच ते मुक्त असतात आणि मिजास राखणारे, बेधुंद... प्रत्येक स्वर जणू त्याचा तो राजाच* (*भूप*,२००६,१५०) अशी शिकवण ते आपल्या मुलाला- विवेकला देतात. ते विवेकला मोठा गायक बनविण्याची स्वप्ने उरी बाळगतात. पण विवेकच्या परेदशी निघून जाण्याने निराशा पत्करावी लागते. पण ते आपली जिद्द न सोडता आपला शिष्य-चितंनला मोठा गायक बनवू इच्छितात. परंतु परिस्थिती या मानी कलावंताची प्रत्येकवेळी हार करु पाहते. विवेक अमेरिकेला परत जाण्यासाठी निघतो तेव्हा त्यांना पॅरिलिससचा झटका येतो. त्यावेळी त्यांचा शिष्य-चितंन त्यांना सोडून जातो. आपल्या शिष्याच्या अशा वागण्यामुळे हतबल झालेले अवधूतपंत विवेकला पाहवत नाहीत. पण त्यांनीच कधी काळी केलेले संस्कार न विसरता विवेक आपल्या वडिलांनी दिलेल्या शिकवणीशी, संस्काराशी एकनिष्ठ राहातो. *विवेक स्वरांशी मैत्री कर, तरच तुला ते वश होतील, संगीत म्हणजे संगीत निर्मळ आनंदाचं वादळ संगीतानं आणलं पाहिजे तरच ते खरं संगीत* (*भूप*,२००६,१५१) असे सांगणारे अवधूतपंत आणि या संगीतातील सुरांमुळेच मागे परतणारा विवेक या दोघा बाप-मुलाच्या जगण्यातील सूर, लय कथेतून चित्रित होते. संगीतक्षेत्राशी संबंधित असणाऱ्या बारीक सारीक तपशीलामुळे

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

अवधूतपंतासारखी कलाप्रेमी व्यक्ती आणि त्या व्यक्तीच्या जीवनाला असलेली अर्थगर्भ खोली दिसते. अशाच एका कलाक्षेत्राला आपल्या जाणिवेने चित्रित केलेली त्यांची दुसरी कथा म्हणजे *आधार.*

एका चित्रकाराचे कलेप्रती असणारे प्रेम, पण ती कला म्हणावी तशी व्यक्त होत नाही म्हणून उद्ध्वस्त झालेला चित्रकार या कथेतून येतो. नियतीने त्याला एकटेपण बहाल केलेले. आई व बहिणीच्या मृत्यूनतंर मतिमंद भाचा फक्त शिल्लक राहतो. मतिमंद देवनचे करण्यात संपूर्ण वेळ निघून जात असल्यामुळे स्वतःची कला विसरत चाललेला अरुण चिडचिडा बनतो. ही चीडचीड दिवसेन्दिवस देवेनवर व्यक्त होत राहते. मनात दडपून राहिलेल्या गोष्टीचा निचरा होण्याची गरज असते. अशावेळी अरुणचे देवेनशी त्याच्याही नकळत संबंध येतात आणि नव्या उमेदीने तो आपली कला व्यक्त करु लागतो. कित्येक दिवस मूक राहिलेला संवाद तो देवेनच्या शरीराच्या माध्यमातून साधतो. अशी ही कलाप्रेमी पण तितकीच संवेदनशील, आपल्या भावना, वासना व्यक्त करणारी अरुण ही व्यक्तिरेखा.

कलेसाठी आपण असण्यापेक्षा कला आपल्यासाठी आहे ह्या तत्त्वाने वागणारे, स्वतःच्या प्रसिद्धीच्या आड येणाऱ्या स्वतःच्या मुलालाही स्वतःच्या आयुष्यातून वजा करणारे, निम्म्या वयाच्या मालविकाशी संबंध ठेवणारे नाथ *जन्म* या कथेतून येतात. तर जेवढी जगण्यावर तेवढीच कलेवर निष्ठा ठेवणाऱ्या बाई. तर सुरुवातीला नाथांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावाखाली असलेला पण नंतर आईचे म्हणणे पटलेला सत्यजीत. संगीत क्षेत्राशी संबंधीत असणाऱ्या ह्या एकाच घराण्यातील व्यक्ती, त्यांचे परस्परभिन्न स्वभाव आणि वृत्ती आणि संगीताशी नाळ जुळवून राहणारी त्यांची भिन्न जीवनशैली या व्यक्तिरेखांमधून आपल्याला दिसून येते.

मानवी भावना कलेतून व्यक्त करणारी व्यक्ती आणि तिची संवेदनदशीलता जशी त्या कथेतून चित्रित करतात. तसेच त्यांची व्यवहारी जगात होणारी परवडही चित्रित करतात. एक व्यक्ती म्हणून त्यांच्या ठिकाणी असणारी वासना, कामना त्याचबरोबर एक कलावंत म्हणून

त्यांच्याकडे असलेले सृजक मन अशा दोन्ही बाजू असलेल्या व्यक्ती, कलाप्रेमी-कलावंत व्यक्तीरेखा त्यांच्या कथेतून येतात. त्यातून त्यांच्या जगण्यातील एकटेपणा, विसंगती, वैफल्य जाणवते तर कधी उफाळून येणाऱ्या वासनांच्या क्रुर खेळाचा प्रत्ययही येतो. जगण्यातील विसंगती दाखविणाऱ्या या व्यक्तिरेखा मोनिका गजेंद्रगडकर आपल्या कथांमधून आणतात.

४. पौगंडावस्थेतील मतिमंद मुलांच्या व्यक्तिरेखा :

लेखिका आपल्या कथेमधून पौगंडावस्थेतील मतिमंद मुलांच्या व्यक्तिरेखा रेखाटतात. हा त्यांच्या कथेचा एक लक्षणीय विशेष आहे. आपल्या समाजातील एक भाग असणाऱ्या मतिमंदांचे विश्व त्या उभ्या करतात.

आधार मधील देवेन हा मतिमंद आहे. सामान्य जीवन जगणाऱ्या पौगडांवस्थेतील मुलांच्या स्वभावात, शरीरात जसे बदल होतात तसेच बदल देवेनमध्येही होऊ लागतात. शरीराची आणि मनाची होणारी वाढ, त्याची मागणी ते स्वतः जाणत नसले तरी त्यांच्या शरीराच्या माध्यमातून व्यक्त होते. या कथेतील देवेनही अशाच शरीराच्या बदलातून वावरतो आहे. चित्रकार मामाच्या दुःखाची, आगतिकतेची, एकटेपणाची दुःखे त्याच्याभोवती सतत फेर धरतात. पण त्यामागची वेदना मात्र त्याच्या बधीर मनाला स्पर्श सुद्धा करत नाही. *आरशातील स्वतःच्या प्रतिमेवर, ओठांवर ओठ टेकवून पाहणारा, अरुणच्या स्पर्शाला प्रतिसाद देणारा* देवेन शरीराच्या माध्यमातून अरुणला भरपूर काही देत जातो. *पण त्याचं हे देणं म्हणजे आपण फुलायचं, आपणच फुंलवायचं नि विझतही जायचं आपणच* (*भूप*,२००६,७०) अशा तऱ्हेचं आहे. प्रत्यक्षात मामाच्या आधाराने जगणारा देवेन अप्रत्यक्षरित्या तो त्याचाच आधार बनून जातो.

तसेच *अर्थ* मधून येणारा गणेश देखील मतिमंद आहे. मतिमंद शाळेतील गणेश आणि त्यांना शिकविण्यासाठी येणारी वीणा यांच्यातील हृदयस्पर्शी भावबंध या कथेतून साकारताना दिसतात. गणेश बुद्धीने जरी मागे पडत असला तरी त्याची माणसाबद्दलची असणारी जाणीव

मात्र विलक्षण आहे. पौगडांवस्थेत गणेशमध्ये होत जाणारे शारीरिक आणि मानसिक बदल, त्याला वीणाचा आवडणारा स्पर्श, तो स्पर्श टाळल्यानतंर त्याच्यामध्ये होणारे हिंसात्मक बदल या गोष्टीचे चित्रण या कथेतून येते. पण पुढे गणेश टवाळखोर मुलांच्या अत्याचाराला बळी पडून कोम्यात जातो.

या व्यवहारी जगात निष्पाप मुलांचा हकनाक गेलेला बळी मनाला चटका लावणारा आहे. व्यवहारी जगाबद्दल कोणतीही तक्रार नसताना त्यांचे निष्पाप आयुष्य मात्र कागदाप्रमाणे चुरगळले जाते. देवेन आणि गणेश या दोन्ही व्यक्तिरेखा मतिमंद असल्या तरी समोरच्या माणसाच्या मनातील दुःख कमी करण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांची ही धडपड मर्यादित असते. व्यवहारातील समाजकंटकाकडून बळी पडलेल्या या व्यक्तिरेखा न बोलताही बरचं काही सांगून जातात. मतिमंद म्हणून त्या झिडकारल्या तरीही विशिष्ट वेळचा त्यांचा समजूतदारपणा थक्क करणारा असतो.

एकूणच मोनिका गजेंद्रगडकर यांनी ही व्यक्तिचित्रे रेखाटताना त्या व्यक्तीचे केवळ बाह्यदर्शन करीत नाहीत तर त्यांच्या अंतरंगात प्रवेश करुन त्यांचे यथातथ्य चित्रण करतात. *लेखिकेचा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोण सश्रद्धतेचा आहे. या वास्तवातच सगळी नाती सांभाळून आपल्या श्रेयाकडे वाटचाल करायला हवी, या भूमिकेतून त्यांची पात्रे जगतात. त्यात कधी यशस्वी होतात, कधी होत नाहीत पण म्हणून त्यांचा जीवनावरचा विश्वास कधी ढळत नाही. म्हणूनच या कथा वाचकाला नैतिक बळ मिळवून देतात.* (मीनाक्षी दादरावाला, डिसे २००९.) त्यांच्या कथेतील व्यक्तिचित्रणाचे विश्व हे बहुविध स्वरूपाचे आहे. महानगरातील मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रीया-पुरुष यांचे प्रामुख्याने चित्रण येते. प्रामुख्याने आई-वडील, प्रियकर- प्रेयसी, भाऊ-बहीण, मुलगा-मुलगी ही रूपे तीमधून व्यक्त झाली आहे. पौगंड मुलांचे विश्व त्या रचतात. त्या त्या पात्रांचे मानसदर्शन त्या घडवितात. व्यक्तिचे स्वभाव, त्याची वर्तनप्रणाली, अतरंग याचे प्रभावीपणे चित्र त्या रेखाटतात.

संदर्भ सूची :-

१. गजेंद्रगडकर, मोनिका२००८. *माझे कथालेखन,* साक्षात, औरंगाबाद, जुऑस२००८.

२. जोशी, सुधा२०००. *कथा संकल्पना आणि समीक्षा,* मुंबई : मौज प्रकाशन.

३. तुपे, केशव२००९. *मोनिका गजेंद्रगडकर यांचे कथालेखन,* समरसता, मार्च-एप्रिल२००९.

४. दादरावाला, मीनाक्षी२००९. *मानवी नातेसंबंधांची बंदिश,* पुस्तक परिचय, डिसेंबर२००९.

५. वैशंपायन, मीना२००९. *अंतर्मुख करणाऱ्या कथा,* दै.प्रहार, मुंबई : १ फेब्रु२००९.